RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : १८

दि. ०६ मे २०२६, वार : बुधवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

# दैनिक महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990


## लातूर जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी


**लातूर/प्रतिनिधी :** कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत ५ मे, २०२६ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते १९ मे, २०२६ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील.

शस्त्रबंदी व जमावबंदी काळात या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बाळगता येणार नाही, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे बाळगणे किंवा जमा करणे किंवा तयार करण्यास मनाई राहील. व्यक्तीचे प्रेत, आकृत्या किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. तसेच जाहीरपणे घोषणा करणे, गाणे म्हणजे वाद्य वाजविण्यास मनाई राहील. ज्यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहोचेल अशा किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपूर्ण भाषणे, हावभाव करणे, सोंग आणणे, चित्रे, चिन्हे फलक किंवा इतर कोणत्याही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे, त्यांचे प्रदर्शन किंवा प्रसार करणे यास मनाई करण्यात आली आहे.

जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राहण्यासाठी कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास, मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अंत्ययात्रा, विवाह, कामावरील पोलीस किंवा इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाही. तसेच शस्त्रबंदी व जमावबंदी काळात सभा, धार्मिक मिरवणूक, मोर्चा, उपोषण यांना परवानगी देण्याचे सर्व अधिकार हे पोलीस अधीक्षक, पोलीस उपअधीक्षक व संबंधित पोलीस निरिक्षक, पोलीस उपनिरीक्षक यांना राहतील. त्यांनी परवानगी देण्यापूर्वी उपविभागीय दंडाधिकारी यांच्याशी सल्लामसलत करून परवानगी द्यावी, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

## दुसऱ्या बौद्ध साहित्य संमेलनाचे उद्घाटक रोहित पिसाळ तर संमेलनाध्यक्षपदी प्रा.डॉ.प्रशांत गायकवाड यांची निवड

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर येथे दिनांक १० मे २०२६ रोजी भालचंद्र ब्लड बँक, लातूर याठिकाणी वेळ ठिक १० वाजता होणाऱ्या दुसऱ्या बौद्ध साहित्य संमेलनाचे





उद्घाटक म्हणून रोहित पिसाळ यांची तर अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. प्रशांत गायकवाड यांची निवड करण्यात आली आहे. मा.रोहित पिसाळे हे प्रसिध्द उद्योगपती तथा धम्म अभ्यासक आहेत तर प्रा.डॉ.प्रशांत गायकवाड हे पेठ वडगाव, जि. कोल्हापूर येथील श्री विजयसिंह यादव महाविद्यालयात गेली २५ वर्षे मराठी विषयाचे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

फुले- आंबेडकरी विचारधारा, बौद्ध संस्कृतीतील मूल्ये, साहित्य, समीक्षा आणि तत्त्वज्ञान हे त्यांचे विशेष अभ्यास विषय आहेत. मराठी साहित्यातील बुद्धचरित्र आणि तत्त्वज्ञान: एक अभ्यास, या विषयावर त्यांनी शिवाजी विद्यापीठातून पीएचडी प्राप्त केली आहे. बौद्ध साहित्यावर आधारित धम्मपहाट (कवितासंग्रह ),तथागत बुद्ध चरित्र आणि तत्त्वज्ञान( समीक्षा), मराठी कथेतील नवे वळण : परिव्रजक (समीक्षा) हे ग्रंथ प्रकाशित आहेत. डॉ. आ.ह.साळुंखे यांच्या जीवनावर आधारित त्यांचे चरित्र लिहिण्याचे कामही डॉ. गायकवाड यांनी केले आहे. सत्य असत्याशी मन केले ग्वाही (आ.ह. साळुंखे : जीवन आणि भूमिका) (चरित्र), आ.ह. साळुंखे : विचारप्रवर्तक मुलाखती (संपादन) आ.ह. साळुंखे आणि चार्वाकदर्शन (समीक्षा) आ.ह.साळुंखे स्त्रीविषयक चिंतन (सहसंपादन) इत्यादी ग्रंथ प्रकाशित आहेत. डॉ. गायकवाड यांनी लिहिलेल्या काही नोंदी ऑनलाईन मराठी विश्वकोशात यापूर्वी प्रकाशित झाल्या आहेत. तर त्यांच्या काही ग्रंथांचा विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात संदर्भ ग्रंथ म्हणूनही समावेश करण्यात आला आहे . यापूर्वी त्यांच्या साहित्यकृतींना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

या संमेलनाच्या चर्चा सत्रामध्ये डॉ. नारायण कांबळे, डॉ.विजय गैबीमोरे, डॉ.गिरीश मोरे, अमित मेधावी यांच्यासह अनेक साहित्यिक उपस्थित राहणार आहेत. समारोपासाठी ज्येष्ठ आंबेडकरी नेते प्रा. सुकुमार कांबळे यांची उपस्थिती आहे. तरी या संमेलनास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन अध्यक्ष-चंद्रकांत शिंदे, कार्याध्यक्ष-राजेंद्र कांबळे, उपाध्यक्ष-भगवान लोखंडे, डी.एस.नरसिंगे, सचिव-यु.डी.गायकवाड, कोषाध्यक्ष - एम.एम.बलांडे, राजेंद्र बनसोडे, मुख्य निमंत्रक - ॲड. धम्मदिप बलांडे, रविंद्र राजेगावकर, शांतरक्षीत सुरवसे, डॉ.लहु वाघमारे, देवदत्त बनसोडे, अशोक बनसोडे, मारूती सरवदे, अलका गायकवाड, मंगलताई कांबळे, पल्लवी घोबाळे आदींनी केले आहे.

# व्हीएस पँथर्सच्या सातव्या सामूहिक विवाह सोहळ्याची लातुरात जय्यत तयारी : खटके

**लातूर/प्रतिनिधी :** व्हीएस पँथर्स युवा संघटन महाराष्ट्र राज्यच्या वतीने भार-तरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीदिनाचे औचित्य साधून लातुरात येत्या दि. १० मे २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या सातव्या सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याची जय्यत तयारी पूर्ण झाल्याची माहिती व्हीएस पँथर्सचे संस्थापक अध्यक्ष विनोद खटके यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत बोलताना दिली.




आपणही समाजाचे काही देणे लागतो, या भावनेने प्रेरित होऊन मागच्या सलग सात वर्षांपासून अशा प्रकारच्या सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन केले जात आहे. आतापर्यंत २०० ते २२५ सर्वधर्मीय सामूहिक विवाह करून देण्यात आले आहेत.यावर्षीच्या विवाह सोहळ्यात एकूण ३५ वधू - वरांचे विवाह लावून दिले जाणार आहेत. यामध्ये मुल्सिम दोन, बौद्ध १८ तर हिंदू समाजातील १५ वधू - वरांचा समावेश आहे. वधू - वरांना मणी मंगळसूत्र, विवाहाच्या चा पेहरावांसह संसारोपयोगी वस्तूंचे वितरण करण्यात येणार असल्याचे विनोद खटके यांनी सांगितले.

हा विवाह सोहळा लातूर शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कच्या भव्य मैदानावर रविवारी सायंकाळी आठ वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. या सोहळ्यासाठी सामाजिक न्याय मंत्री संजय सिरसाठ, लातूरचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, खा. डॉ. शिवाजीराव काळगे, यांच्यासह माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर, आ.अभिमन्यू पवार, माजी मंत्री आ. संजय बनसोडे, माजी मंत्री आ. अमित देशमुख, आ. रमेशआप्पा कराड, शिक्षक आमदार विक्रमबप्पा काळे, एमएसआरडीसीचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड आदी मान्यवरांनाही निमंत्रित करण्यात आले आहे. या सर्वधर्मीय विवाह सोहळ्यास हजारोंच्या संख्येने वऱ्हाडी मंडळी उपस्थित राहणार असून त्या सर्वांच्या सुरुची भोजनाची सोय करण्यात आली आहे. या सोहळ्यासाठी येणाऱ्या लोकांच्या वाहनांच्या पार्किंगची व्यवस्था जुन्या रेल्वे लाईनलगतच्या विलासराव देशमुख रस्त्याच्या बाजूने करण्यात आली आहे. वाहतुकीचा खोळंबा होणार नाही, याची सर्वतोपरी काळजी आमच्या स्वयंसेवकांकडून घेतली जाणार असल्याचे खटके यांनी सांगितले. प्रतिवर्षाप्रमाणे होणाऱ्या या सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्यास लातूरकरांनी उपस्थित राहून वधू - वरांना शुभाशीर्वाद द्यावेत,असे आवाहनही विनोद खटके यांनी केले आहे.

याप्रसंगी व्हीएस पँथर्सचे प्रदेशाध्यक्ष सचिन मस्के यांच्यासह संपर्क प्रमुख आनंद जाधव, मराठवाडा अध्यक्ष निलेश कांबळे, रवि कुरील, विद्यार्थी आघाडी मराठवाडा अध्यक्ष प्रितम दंडे, कामगार आघाडी जिल्हाध्यक्ष किरण पायाळ शहराध्यक्षअसद शेख,विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष स्वप्नील कांबळे, यांसह मान्यवरांची उपस्थिती होती.

## व्ही एस पँथर्स च्या विलासराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयातील भोजन सेवेचा २०० वा दिवस उत्साहात साजरा




**लातूर/प्रतिनिधी :** येथील व्ही एस पँथर्स युवा संघटन हे लातूर जिल्ह्यातील सामाजिक उपक्रम राबविण्यात अग्रेसर असलेले संघटन आहे याचं नेतृत्व विनोदभाऊ खटके हे करतात. संघटनेच्या वतीने विलासराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयात येणाऱ्या रुग्णांच्या नातेवाईकासाठी व्ही एस पँथर्स युवा संघटनेच्या वतीने भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे.

आठवड्यातून दोनदा सोमवारी आणि गुरुवारी भोजनदान केले जाते.आजच्या २०० व्या दिवशी भोजनदानाचा शुभारंभ लातूर शहर मनपा चे स्थायी समिती सभापती सचिन बंडा पल्ले यांच्या हस्ते भोजन वितरण करून करण्यात आला.

यावेळी बोलताना सचिन बंडा पल्ले यांनी संघटनेच्या या उपक्रमाचे भरभरून कौतुक केले. यावेळी डॉ सिद्धार्थ सूर्यवंशी, संघटनेचे सं अध्यक्ष विनोद भाऊ खटके मार्गदर्शक संतोष मांदळे, रवि कुरील, विद्यार्थी विभाग मराठवाडा अध्यक्ष प्रीतम दंडे संपर्क प्रमुख आनंद जाधव, कामगार आघाडी जिल्हाध्यक्ष किरण पायाळ, जिल्हाकार्याध्यक्ष अकबर शेख, विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष स्वप्नील कांबळे, ऑटो युनियन जिल्हाध्यक्ष देवा गायकवाड, विद्यार्थी आघाडी जिल्हा उपाध्यक्ष सुरज कांबळे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख सुजीत कांबळे मनोज कांबळे, हर्ष मांदळे, महावीर कांबळे पप्पू आदमाने, मोरेश्वर पांचाळ ह आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांचा लातूर जिल्हा दौरा

**लातूर/प्रतिनिधी :** राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड हे बुधवार, ६ मे २०२६ रोजी लातूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.



मृद व जलसंधारण मंत्री श्री. राठोड यांचे ६ मे रोजी सकाळी ६.३० वाजता लातूर रेल्वे स्टेशन येथे आगमन होईल व लातूर शासकीय विश्रामगृहाकडे प्रयाण करतील. सकाळी ६.५० वाजता लातूर शासकीय विश्रामगृह येथे आगमन होईल व राखीव. सकाळी ९ वाजता लातूर येथून औसाकडे प्रयाण करतील. सकाळी ९.३० वाजता औसा येथे आमदार अभिमन्यू पवार यांच्या निवासस्थानी राखीव. सकाळी १०.३० ते दुपारी १२.३० वा. दरम्यान औसा तालुक्यातील फतेहपूर, दावतपूर येथील मृद व जलसंधारण विभागाच्या कामांच्या स्थळ पाहणीसाठी राखीव. दुपारी १२.३० वाजता औसा शासकीय विश्रामगृह येथे राखीव. दुपारी १.१५ वाजता औसा येथून लातूरकडे प्रयाण करतील.

मृद व जलसंधारण मंत्री श्री. राठोड यांचे दुपारी १.४५ वाजता लातूर शासकीय विश्रामगृह येथे आगमन होईल व अभ्यागतांच्या भेटीसाठी राखीव. दुपारी २.१५ वाजता ते लातूर शासकीय विश्रामगृह येथे शिवसेना पदाधिकाऱ्यांसोबत चर्चा करतील. दुपारी ३ वाजता त्यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयात मृद व जलसंधारण विभागाशी संबंधित विविध विषयांच्या अनुषंगाने आढावा बैठक होईल. सायंकाळी ५ वाजता वाडा बँक्वेट हॉल येथे श्री. बळीराम रुपचंद जाधव लिहित 'गोरमाटी भास्या सब्दकोस' या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यास ते उपस्थित राहतील. त्यानंतर सोयीनुसार यवतमाळकडे प्रयाण करतील.

## लातूरमध्ये ३ हजारांच्या वर डिझेल देईनात, पेट्रोल पंपावर गर्दी; शेतकऱ्यांना नांगरटीला अडचणी, बीडमध्येही रांगा

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यात पेट्रोल आणि डिझेलचा तुटवडा निर्माण झाल्यामुळे बहुतांश पेट्रोलपंपांवर आज सकाळपासूनच वाहनधारकांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. लातूर शहरात इंधन भरण्यासाठी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या असून, या वाढत्या गर्दीमुळे पंप कर्मचाऱ्यांची चांगलीच तारांबळ उडत असल्याचे चित्र आहे. गेल्या दोन दिवसांपासून शहरात इंधनटंचाईची परिस्थिती कायम असून, अनेक पंपांवर साठा मर्यादित प्रमाणात उपलब्ध आहे. सलग तीन दिवसांच्या सुट्ट्यांमुळे इंधनाच्या मागणीत अचानक वाढ झाल्याने हा तुटवडा निर्माण झाल्याचे सांगितले जात आहे.

# ठाणे जिल्ह्याला 'ड्रग्ज फ्री' करण्यासाठी सर्व यंत्रणांनी एकत्र यावे : निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदिप माने

**ठाणे/प्रतिनिधी :** ठाणे जिल्ह्याला अंमली पदार्थमुक्त करण्यासाठी केवळ एका विभागाने नाही, तर सर्वच शासकीय विभागांनी समन्वयाने आणि प्रभावीपणे काम करणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदिप माने यांनी आज येथे केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील समिती सभागृहात आयोजित जिल्हा नार्को को-ऑर्डिनेशन सेंटर समितीच्या बैठकीत ते बोलत होते.

या बैठकीत डॉ. माने यांनी पोलीस, महसूल, आरोग्य आणि उत्पादन शुल्क विभागाला स्पष्ट निर्देश दिले की, अंमली पदार्थांच्या तस्करीला आळा घालण्यासाठी या सर्व यंत्रणांनी एकमेकांशी माहितीची देवाणघेवाण करून संयुक्त कारवायांचा वेग वाढवावा. तस्करीच्या सद्यस्थितीचा आढावा घेऊन प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर द्यावा.

अंमली पदार्थांच्या विळख्यातून तरुण पिढीला वाचविण्यासाठी शाळा आणि महाविद्यालयीन परिसरामध्ये जनजागृती मोहिमांचे काटेकोर नियोजन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच, जिल्ह्यातील व्यसनमुक्ती केंद्रांना आवश्यक ते तांत्रिक सहकार्य आणि मार्गदर्शन प्रशासनामार्फत उपलब्ध करून दिले जाईल, अशी ग्वाही देखील त्यांनी दिली.



या बैठकीला ठाणे शहर पोलीस उपअधीक्षक श्रीमती भोसले, पोलीस निरीक्षक राजेंद्र निकम, समीर शेख, सहायक पोलीस निरीक्षक लहू सातपुते यांच्यासह औद्योगिक सुरक्षा, अन्न व औषध प्रशासन, शिक्षण विभाग, जिल्हा परिषद समाज कल्याण, कृषी, केंद्रीय वस्तू व सेवा कर, टपाल आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

ठाणे जिल्ह्याला अंमली पदार्थमुक्त करण्याच्या दिशेने जिल्हा प्रशासनाने उचललेले हे एक निर्णायक पाऊल असून, भविष्यातील रणनीतीवरही या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

संपादकीय...

## डिजिटल अर्थपर्वाला जागतिक मोहोर

डिजिटल क्रांतीमुळे लघुउद्योगांची उत्पादकता उंचावल्याची मोहोर जागतिक नाणेनिधीने उमटवली असतानाच, एप्रिलमधील २.४३ लाख कोटींच्या विक्रमी 'जीएसटी' संकलनाने भारतीय अर्थव्यवस्थेच्या सुदृढतेवर शिक्कामोर्तब केले आहे. पारदर्शकता आणि तंत्रज्ञानाच्या बळावर भारताने आर्थिक सक्षमीकरणाच्या दिशेने टाकलेले हे पाऊल विकसित भारताची आश्वासक नांदी ठरत आहे. जागतिक अर्थव्यवस्थेच्या पटलावर भारताची प्रतिमा आता एक 'विकसनशील देश' इतकीच राहिलेली नसून, ती एका 'आर्थिक महासत्ता' बनू पाहणाऱ्या राष्ट्राची झाली आहे. गेल्या काही वर्षांत भारताने घेतलेली आर्थिक झेप ही निव्वळ योगायोग नसून, ती सुस्पष्ट धोरणे आणि तंत्रज्ञानाचा कल्पक वापर यांचा परिपाक ठरते. नुकताच समोर आलेला जागतिक नाणेनिधीचा अहवाल आणि एप्रिल महिन्यातील वस्तू व सेवा कराच्या संकलनाचे आकडे, हे याच वास्तवावर लख्ख प्रकाश टाकणारे आहेत. भारताने गेल्या दशकभरात राबवलेल्या डिजिटल सुधारणा केवळ सरकारी घोषणा नव्हत्या, तर त्या तळागाळातील अर्थव्यवस्थेचा पाया मजबूत करणाऱ्या धोरणात्मक हालचाली होत्या, हे आता जगाने मान्य केले आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेचा खरा कणा हा सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्रात दडलेला आहे. कोट्यवधी लोकांना रोजगार देणारे हे क्षेत्र दीर्घ काळ लाल फितीच्या कारभारात, कागदपत्रांच्या जंजाळात आणि जाचक अटींमध्ये अडकले होते. मात्र, 'डिजिटल इंडिया' मोहिमेने या क्षेत्राचा चेहरामोहराच पूर्णपणे बदलून टाकला आहे. जागतिक नाणेनिधीच्या शोधनिबंधानुसार, भारताच्या डिजिटल पायाभूत सुविधांमुळे या उद्योगांच्या उत्पादकतेत अभूतपूर्व वाढ झाली आहे. या अहवालातील सर्वांत महत्त्वाचा निष्कर्ष म्हणजे, ज्या राज्यांनी डिजिटल साधनांचा अंगीकार अधिक वेगाने केला, तिथे उद्योगांची कार्यक्षमता आणि नफा वाढल्याचे ठळकपणे दिसून आले आहे. डिजिटल साधनांमुळे 'कॉम्प्लायन्स कॉस्ट' म्हणजेच, नियमांच्या पालनासाठी लागणारा खर्च आणि वेळ लक्षणीयरित्या कमी झाला आहे. पूर्वी ज्या प्रक्रियांसाठी सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागत, त्या प्रक्रिया आता एका क्लिकवर उपलब्ध आहेत. 'ई-इनव्हॉइसिंग', 'डिजिटल पेमेंट' आणि सरकारी पोर्टलवरील सुलभ नोंदणी यांमुळे, लहान उद्योजकांना आता मोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांच्या बरोबरीने स्पर्धा करणे शक्य झाले. या पारदर्शकतेमुळेच भ्रष्टाचार कमी झाला असून, उद्योजकांचा व्यवस्थेवरील विश्वासही वाढला आहे. देशाच्या आर्थिक प्रगतीचे सर्वांत अचूक मोजमाप म्हणजे, तिजोरीत जमा होणारा कर. एप्रिल २०२६ मधील 'जीएसटी' संकलनाने सर्व जुने विक्रम मोडीत काढत,२.४३ लाख कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला. हा आकडा फक्त थक्क करणाराच आहे असे नाही, तर तो भारतीय अर्थव्यवस्थेच्या विस्ताराचेही द्योतक ठरला आहे. गेल्या वर्षीच्या याच महिन्यातील २.२३ लाख कोटी रुपयांच्या तुलनेत झालेली ८.७ टक्क्यांची वाढ ही किरकोळ नसून, ती देशांतर्गत मागणी आणि व्यापारातील सातत्य दर्शवते. विशेषतः, आयातीशी संबंधित 'जीएसटी' महसुलात झालेली २५.८ टक्क्यांची प्रचंड वाढ, ही भारताची वाढती औद्योगिक भूक आणि जागतिक व्यापारातील वाढते वजन स्पष्ट करते. करप्रणालीतील सुटसुटीतपणा, 'ई-वे बिल' प्रणालीची अंमलबजावणी आणि 'डेटा ॲनालिटिक्स'च्या वापरामुळे, करचोरीला मोठ्या प्रमाणावर पायबंद बसला आहे. 'एक देश, एक कर' ही संकल्पना आता घोषणा न राहता, ती महसूलवाढीचे मुख्य इंजिन झाली आहे. आज प्रामाणिक करदात्यांची संख्या सातत्याने वाढत असून; कारण त्यांना आपला कर देशाच्या पायाभूत सुविधा उभारणीसाठी वापरला जात असल्याची खात्री पटू लागली आहे. 'आयएमएफ'च्या अहवालात नमूद केल्याप्रमाणे, डिजिटायझेशन आणि उत्पादकता यांचा थेट संबंध आहे. महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक आणि तामिळनाडू यांसारख्या राज्यांनी डिजिटल पायाभूत सुविधांमध्ये केलेली गुंतवणूक, आज त्यांच्या औद्योगिक प्रगतीतून स्पष्टपणे दिसून येत आहे. या राज्यांनी केवळ तंत्रज्ञान स्वीकारलेच नाही, तर ते शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवलेही. यामुळे उत्पादनातील अडथळे कमी झालेच आणि पुरवठा साखळीही अधिक वेगवान झाली. इतर राज्यांसाठी हा एक मोठाच वस्तुपाठ ठरतो. भविष्यातील आर्थिक शर्यतीत टिकायचे असेल आणि राज्याचा विकासदर वाढवायचा असेल, तर तंत्रज्ञानाच्या अंगीकाराशिवाय दुसरा पर्याय नाही. डिजिटल क्रांतीने केवळ महानगरांनाच नव्हे, तर निमशहरी आणि ग्रामीण भागातील लघुउद्योजकांनाही थेट जागतिक बाजारपेठेशी जोडण्याचे काम केले. आज कोल्हापूरची चप्पल असो वा येवल्याची पैठणी, डिजिटल प्लॅटफॉर्ममुळे या वस्तू जागतिक स्तरावर विकल्या जात आहेत. शिवाय, त्याचा थेट महसूल 'जीएसटी'च्या रूपात सरकारी तिजोरीत जमा होत आहे. डिजिटायझेशनचा सर्वांत मोठा फायदा म्हणजे पारदर्शकता. जेव्हा व्यवहार डिजिटल होतात, तेव्हा ते 'फॉर्मल इकोनॉमी'चा भाग बनतात. यामुळे बँकांना या लघुउद्योगांना कर्ज देणे सोपे झाले असून, कारण त्यांच्याकडे व्यवहारांचा अधिकृत डिजिटल पुरावा असतो. ही क्रेडिट सुलभता सूक्ष्म उद्योगांच्या विस्तारासाठी अत्यंत महत्त्वाची ठरली. 'जीएसटी'च्या डेटाचा वापर करून, बँका आता काही मिनिटांत कर्ज मंजूर करत आहेत. ही एक मोठीच क्रांती आहे, जिने सावकारी पाशातून लहान उद्योजकांना मुक्त केले. आपण २.४३ लाख कोटींचा टप्पा गाठला असला आणि 'आयएमएफ'ने आपली पाठ थोपटली असली, तरी आत्मसंतुष्ट राहून चालणार नाही. सायबर सुरक्षा, डेटा गोपनीयता आणि ग्रामीण भागातील डिजिटल दरी कमी करणे ही आव्हाने, आजही आपल्यासमोर आहेत. जागतिक स्तरावर भू-राजकीय अनिश्चितता असताना, भारताने आपली ही गती टिकवून ठेवणे आवश्यक आहे. लघुउद्योगांना कृत्रिम बुद्धिमत्ता आणि 'इंटरनेट ऑफ थिंग्ज'सारख्या प्रगत तंत्रज्ञानाशी जोडण्यासाठी, आता पावले उचलण्याची गरज आहे. 'जीएसटी' प्रणाली अधिक सुटसुटीत करून मध्यम आणि लहान व्यापाऱ्यांवरील ताण कसा कमी करता येईल, यावरही सतत विचार व्हायला हवा भारताच्या या यशाचे रहस्य हे 'नॅशनल डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर' आणि पारदर्शक करप्रणाली यांच्या यशस्वी मिलापात दडलेले आहे. 'जीएसटी'चे वाढते आकडे हे देशाच्या आर्थिक आरोग्याचे निदर्शक आहेत, तर डिजिटल सुधारणा या सामान्य माणसाच्या सक्षमीकरणाचे शस्त्र ठरल्या आहेत. जेव्हा सरकारी धोरणे ही केवळ फाईल्समध्ये बंद न राहता, सामान्यांच्या जीवनात 'ईज ऑफ डुईंग बिझनेस' आणतात, तेव्हाच असा आर्थिक चमत्कार घडतो. भारत आज केवळ स्वतःच्या प्रगतीचा मार्ग आखत नसून, जगासाठी एक नवे 'इकोनॉमिक मॉडेल' सादर करत आहे. २.४३ लाख कोटींचा 'जीएसटी'चा उच्चांक हा भारताच्या आर्थिक सार्वभौमत्वाचा, स्वावलंबनाचा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील 'विकसित भारत' संकल्पनेचा विजयी उद्घोष आहे.

# संघर्षातून साहित्याकडे आणि अध्यापनातून समाजसेवेकडे - ठाण्याच्या जया राव यांचा प्रेरणादायी प्रवास

ठाणे शहरात वास्तव्यास असलेल्या श्रीमती जया बाळकृष्ण राव यांचे आयुष्य म्हणजे जिद्द, चिकाटी आणि कर्तृत्वाचा एक देदीप्यमान प्रवास आहे. केंद्र आणि राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या महिला सक्षमीकरण मोहिमेच्या निमित्ताने त्यांचे कार्य समाजासमोर येणे ही गौरवाची बाब आहे. मूळच्या कर्नाटक राज्यातील असलेल्या जया राव यांनी केंद्रीय विद्यालय संघटन अंतर्गत सुमारे ४१ वर्षे इंग्रजी विषयाच्या प्राध्यापिका आणि विभाग प्रमुख म्हणून प्रदीर्घ सेवा बजावली आहे.

पुण्याच्या बी.ई.जी. केंद्रीय विद्यालयातून २००९ मध्ये निवृत्त झालेल्या राव यांना त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील योगदानासाठी 'आचार्य अत्रे पुरस्कार' आणि एल.आय.सी. चा 'बेस्ट टीचर पुरस्कार' यांसारख्या मानाच्या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या या यशाचा पाया हा अत्यंत आव्हानात्मक परिस्थितीत रचला गेला होता. गेल्या ४० वर्षांपासून त्यांनी एकल पालकत्वाची जबाबदारी समर्थपणे पेलली आहे. घर, शासकीय नोकरी, मुलांचे शिक्षण आणि वारंवार होणाऱ्या बदल्या अशा अनेक समस्यांना तोंड देत त्यांनी आपल्या दोन्ही मुलांना उच्चशिक्षित आणि स्वावलंबी बनवले, जे आज परदेशात स्थायिक आहेत.

जया राव यांचे भाषेवर कमालीचे प्रभुत्व असून मराठी, इंग्रजी आणि हिंदी या तिन्ही भाषांमध्ये त्या प्रभावी लेखन आणि काव्य सादरीकरण करतात. विशेषतः कारगिल विजयावर त्यांनी लिहिलेली 'ए टू झेड' वर्णमालेतील कविता आजही अनेकांच्या स्मरणात आहे. निवृत्तीनंतरही त्यांनी स्वतः ला विश्रांतीच्या चौकटीत अडकून न ठेवता सामाजिक आणि आध्यात्मिक कार्यात झोकून दिले आहे. त्या केवळ एक उत्कृष्ट शिक्षिकाच नव्हत्या, तर आजही त्या 'ब्रह्मविद्या' आणि प्राचीन योगशास्त्राच्या माध्यमातून लोकांच्या शारीरिक आणि मानसिक उन्नतीसाठी कार्य करत आहेत. कोरोनाच्या कठीण काळात त्यांनी 'हिरकणी पुरस्कार' मिळवून आपली सामाजिक बांधिलकी सिद्ध केली. सध्या त्या ठाण्यातील कोळशेत येथील केंद्रीय विद्यालयात मार्गदर्शनपर भेटी देतात आणि 'उडान' सारख्या स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून मुलांसाठी भाषा आणि योगाचे वर्ग विनामूल्य घेतात. त्यांच्या या झंझावाती प्रवासातून हेच सिद्ध होते की, जर मनात इच्छाशक्ती असेल तर वयाची कोणतीही मर्यादा स्त्रीच्या कर्तृत्वात अडथळा ठरू शकत नाही.



# कला मानव्यविद्या शाखा; अमर्याद संधींचे प्रवेशद्वार !!!

साधारणपणे पारंपरिक पदवी कला, विज्ञान, वाणिज्य शाखा सर्वपरिचित आहेतच. यातील कला शाखेचा समावेश मानव्यशास्त्र व सामाजिक शास्त्रे (Humanities Social Sciences) या विभागांतर्गत होतो. मानवी शास्त्र आणि सामाजिक शास्त्र हे एकंदरित मानवी वर्तन, मूल्य, इतिहास, तत्त्वज्ञान, भाषा, कला, साहित्य तसेच समाजातील मानवी संबंध, समाज रचना, प्रशासकीय, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक वातावरण इत्यादी यांचा संशोधनात्मक व वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करणारी शास्त्र होय. मानवी संस्कृतीचा अर्थ समजून मानवी कृतीमधील का थहू समजून घेणारे शास्त्र होय. सामाजिक संशोधनाच्या माध्यमातून सामाजिक समस्यांचा विश्र्लेषणात्मक, चिकित्सक, चर्चात्मक, व्याख्यानात्मक पद्धतीच्या आधारे समस्येच्या मुळाशी जाऊन त्या सुधारणा घडवून आणणे तसेच प्रयोगांच्या माध्यमातून सांख्यिकीय व गुणात्मक तथ्यांचा वापर करून क्रांती घडविणे व मानवाचे कल्याण करणे हा असा हेतू असतो.

व्यक्तिमत्त्व विकास विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व सर्वार्थाने यशस्वी जीवनासाठी कला शाखेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. कला शाखा ही केवळ शिक्षणाची किंवा फक्त नोकरीची हमी देणारी शाखा नाही तर ती माणूस घडविण्याची कार्यशाळा आहे. कला शाखेचा आयाम इतका व्यापक आहे की, तो समजून घेण्यासाठी व्यापक दृष्टीची गरज आहे, जी आज हरवत चालली आहे असे भासते. कला शाखेमध्ये विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्ता व गुणवत्तेला आकाश स्वातंत्र्य असताना करिअरच्या मोठ्या संधी उपलब्ध असूनही आपण ठराविक करिअरच्या मागे चजइ झीूलहेश्रेसू नुसार लाखोंच्या संख्येने मुलांना यंत्रांचे गुलाम बनवत आहोत का? यावर एकदा विचार करावा. मेडिकल इंजिनियरिंगचे शिक्षण घेताना जीवघेण्या स्पर्धेतून विद्यार्थी आज जात आहेत त्यामुळे मानसिक शारीरिक ताण-तणाव झेलून त्यातील काहीजण डॉक्टर, इंजिनियर झाले तरी देखील स्पर्धा राहतेच, काही जणांना खूप कमी वेतनावर नोकरी करावी लागते. या उलट कला शाखा विद्यार्थ्यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचा विकास घडवते. यामध्ये विद्यार्थी विचारशक्ती, लेखन, कौशल्य, अभिव्यक्ती, आकलन, संवाद, व्यवस्थापन, भाषाशैली, मूल्य ज्ञान, सामाजिक भान यात पारंगत होतो. कला शाखेची हीच ताकद आहे. ती विद्यार्थ्यांची वैचारिक शक्ती जागृत करते. त्यांच्यातील सुप्त कला कौशल्यांना वाव देते. ज्यामुळे विद्यार्थी संवेदनशील बनतो.

**जीवनमूल्ये व सामाजिक बांधिलकी**

कला शाखेतील विषय, लोकप्रशासन, तत्त्वज्ञान, राज्यशास्त्र, पर्यावरण शास्त्र, समाजशास्त्र, भूगोल, मानसशास्त्र, अर्थशास्त्र, मराठी, हिंदी, इंग्रजी भाषा विषय, संगीत, चित्रकला, नृत्य व क्रीडा इत्यादी हे सर्वच विषय केवळ परीक्षेपूर्वी मर्यादित नाहीत तर यामुळे जीवनाच्या परीक्षेत यशस्वी होण्यासाठी दिशा मिळते, हे विषय विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक विचारसरणी विकसित करतात तसेच विद्यार्थ्यांना उपयोजित -ंश्रिळशव ज्ञान देतात. जे दैनंदिन जीवनात व करिअरमध्ये उपयुक्त ठरतात. हे विषय विद्यार्थ्यांचा बौद्धिक पाया भक्कम करून त्यांना सुजाण सजग नागरिक बनवतात. त्यांच्यात अंतर्बाह्य परिवर्तन घडवतात. विद्यार्थ्यांमध्ये एक मानवतावादी दृष्टिकोन विकसित करण्याची जबरदस्त ताकद या शाखेमध्ये आहे. जीवनातील कोणत्याही आव्हानांना सामोरे जाण्यासाठी नैतिक बळ देते त्यामुळे कला शाखा माणसातील माणूसपणा घडवणारी कार्यशाळा आहे.

**सृजनशीलता**

कला शाखा म्हणजे सृजनतेचा खजिना आहे. या शाखेतील विद्यार्थी जिज्ञासू व चाणाक्ष असतील तर त्यामधून चाणक्य कौटिल्य बनू शकतील, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर बनू शकतील, जगतज्योती महात्मा बसवेश्र्वर बनू शकतील, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, शिक्षण महर्षी डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन, धडाडीचे हुशार नेतृत्व इंदिरा गांधी, समाजाचे निःस्वार्थ सेवा करणाऱ्या सिंधुताई सपकाळ व बाबा आमटे, भ्रष्टाचार विरोधी उपोषण करणारे अण्णा हजारे बनतील, संसदेत व राज्य विधानसभेत जनतेच्या समस्या रोखठोकपणे मांडणारे विलासराव देशमुख बनतील, राजकारणात नैतिकता व गुणवत्तेला प्राधान्य देऊन कार्य करणारे आदरणीय शिवराज पाटील चाकूरकर बनू शकतील, गुन्हेगारीला आळा घालणारे विश्र्वास नांगरे पाटील, किरण बेदी बनू शकतील, सामान्यांना न्याय देण्यासाठी पराकाष्ठा करणारे ज्येष्ठविधीज्ञ राम जेठमलानी, ॲड. उज्ज्वल निकम बनू शकतील, नि:पक्षपातीपणे न्यायदान करणारे न्यायाधीश चंद्रचूड, न्यायाधीश भगवती बनू शकतील, उत्कृष्ट प्रशासकीय अधिकारी अविनाश धर्माधिकारी, राजेश कुमार मीना, स्मिता सबरवाल, दुर्गाशक्ती नागपाल बनू शकतील, आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचा झेंडा अभिमानाने उंचावणारे कपिल देव, सचिन तेंडुलकर, सानिया मिर्झा, विश्र्वनाथ आनंद बनतील, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कलाकार पं.शिवकुमार शर्मा, पं.हरिप्रसाद चौरसिया गाणकोकिळा लता मंगेशकर, एम एफ हुसेन ,अमिताभ बच्चन बनू शकतील, संगीतकार ए आर रहमान, अजय अतुल बनू शकतील, मराठी नाट्यसृष्टीचे जनक कुसुमाग्रज पु.ल .देशपांडे बनतील आणि भारताचे भविष्य उज्वल बनवू शकतील,

**स्पर्धा परीक्षा व कला शाखा**

स्पर्धा परीक्षा हा करिअरचा खरोखरच राजमार्ग आहे. मेहनत करून एकदा तुम्ही यशस्वी झालात की निवृत्तीपर्यंत तुम्हाला आर्थिक स्थैर्य, प्रतिष्ठा व अधिकार मिळतात. या अधिकारांचा वापर करून जनतेची सेवा करू शकतात. स्पर्धा परीक्षा म्हणजे आपणास एम.पी.एस.सी. व यु.पी.एस.सी. एवढे दोनच शब्द माहित असतात परंतु स्पर्धा परीक्षा म्हणजे परीक्षा व विविध पदांचा अथांग सागर आहे. यूपीएससी नागरी सेवेच्या सर्वोच्च पदासाठी परीक्षा घेते आयएएस, आयपीएस, आयएफएस, इंडियन इंजीनियरिंग सर्विसेस, इंडियन मेडिकल सर्व्हिसेस, इंडियन अग्रिकल्चर सर्व्हिसेस, कम्बाईन डिफेन्स सर्विसेस इत्यादी अशा महत्त्वाच्या पदांसाठी परीक्षा घेत असते.

एमपीएससी ही संस्था उपजिल्हाधिकारी, पोलीस उपअधीक्षक, विक्रीकर अधिकारी, तहसीलदार, शिक्षण अधिकारी, पोलीस सब इन्स्पेक्टर, जीएसटी ऑफिसर, मंत्रालयातील कक्ष अधिकारी, सहाय्यक कक्ष अधिकारी, विभागीय अधिकारी, समाज कल्याण विभाग, महिला बालकल्याण विभाग, आरटीओ इन्स्पेक्टर, परिवहन विभाग, प्रोजेक्ट ऑफिसर, कृषी विभाग, महाराष्ट्र वन परीक्षा, सहाय्यक विक्री कर आयुक्त, उपनिबंधक, गट विकास अधिकारी इत्यादी अशा अनेक महत्त्वाच्या पदांसाठी परीक्षा घेऊन गुणवत्ताधारक उमेदवाराची निवड केली जाते.

तसेच विमा क्षेत्र, रेल्वे, स्टाफ निवड या पदांची भरती हजारोंच्या संख्येने होत असते. संयुक्त परीक्षा यामध्ये कोणताही पदवीधारक या परीक्षेत बसू शकतो. दरवर्षी २०,००० - २५,००० पदे या परीक्षेतून भरली जातात. या परीक्षा अंतर्गत सीबीआय इन्स्पेक्टर, कस्टमएक्साईज इन्स्पेक्टर, जनरल गव्हर्मेंट मिनिस्ट्री इन्स्पेक्टर, सेंट्रल गव्हर्नमेंट मिनिस्ट्रीच्या कार्यालयामध्ये सेक्शन ऑफिसर अशी महत्त्वाची पदे भरली जातात.

लिपिक पदासाठी स्वतंत्र परीक्षा घेतली जाते. सरळ सेवा भरती मधून महाराष्ट्र शासन ७२,००० जागा भरण्याच्या प्रक्रियेमध्ये आहे. या अनेक परीक्षांपैकी विद्यार्थ्यांना त्यांच्या पदवीनुसार एकच परीक्षा द्यायची असते. तेवढ्याच परीक्षेचा अभ्यासक्रम पहायचा असतो. केंद्रीय लोकसेवा आयोग व महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या विविध स्पर्धा परीक्षांमध्ये लवकर यश मिळणाऱ्या उमेदवारांमध्ये कला शाखेच्या विद्यार्थ्यांची संख्या अधिक असते. कारण या विद्यार्थ्यांना या परीक्षांचा मूलभूत अभ्यासक्रम बी.ए.करताना स्पष्ट झालेला असतो तसेच अवांतर वाचनाला वेळ मिळतो, त्यामुळे एमपीएससी यूपीएससी व पोलीस भरतीत कला शाखेच्या सर्वाधिक विद्यार्थ्यांची निवड होताना निदर्शनास येते.आपण पाहत आहोत की विज्ञान-तंत्रज्ञान -ख यामुळे जग खूप वेगाने विकसित होत आहे. प्रत्येक क्षेत्रात ए आयचे मानवावर वर्चस्व निर्माण होत आहे म्हणजेच मानवी मन व मानवी मेंदूवर यंत्रांचे वर्चस्व प्रस्थापित झाल्यावर मानवतावादी दृष्टिकोन धोक्यात येण्याची शक्यता आहे त्यामुळे एआय सोबत हात मिळवणी करताना मूल्ये, नैतिकता, सामाजिक बांधिलकी, विवेक बुद्धी व माणुसकीची समाजात पुनर्प्राणप्रतिष्ठा करायची असेल तर ज्ञान, कला, कौशल्य, गुणवत्ता, तत्वे, सिद्धांत, अनुभव संधी-सेवा व आनंददायी शिक्षणाने समृद्ध अशा कलाशाखेचा सर्वोत्तम पर्याय असू शकतो.

**कला शाखेतील विषयांचे महत्त्व**

इतिहास हा विषय म्हणजे मानवी संस्कृतीचा आरसा असतो. मानवी प्रगतीचा क्रम शिकवतो. भूतकाळातील अनुभवातून वर्तमानात निर्णय कसे घ्यावेत हे शिकवणे व त्यामुळे भविष्यात विकासाकडे वाटचाल चालू राहते तसेच ऐतिहासिक घटनांचे चिकित्सक विश्र्लेषण करून माहितीची सत्यता पडताळण्याचे कौशल्य विकसित होतात. या विषयात इतिहास संशोधक पुरातत्त्व शास्त्रज्ञ शिक्षक प्राध्यापक पत्रकार म्युझियम क्युरेटर म्हणून करिअर करता येते.

लोकप्रशासन म्हणजे कृतीशील शासन होय. हा विषय शासन कोणते आणि कसे कार्य करते या प्रश्र्नांची उकल करतो. म्हणजेच प्रशासकीय यंत्रणा, शासकीय धोरणे, संविधान व कायद्याची अंमलबजावणी, व्यवस्थापन कौशल्य यासंबंधी सविस्तर ज्ञान देतो. आय.ए.एस, आय.पी.एस., आय.एफ.एस. व इतर सरकारी कर्मचारी-अधिकारी होण्यासाठी हा विषय अत्यंत महत्त्वाचा आहे. शिक्षक, प्राध्यापक, राजनीतिज्ञ, पत्रकार, संशोधक, वकील, च.इ.-., ह्युमन रिसोर्सेस, मॅनेजमेंट, समाजसेवक, धोरण निर्मिती, विश्र्लेषक म्हणून करिअर घडवता येते. स्पर्धा परीक्षांसाठी हा विषय ऑप्शनल म्हणून अत्यंत महत्त्वाचा व अधिक स्कोरिंग चा विषय आहे.

राज्यशास्त्र हा विषय देशाची राजकीय वातावरण व शासन व्यवस्था याविषयी ज्ञान देतो. एक नागरिक म्हणून लोकशाही, निवडणूक, संसद, आंतरराष्ट्रीय संबंध, परराष्ट्र धोरण, स्थानिक स्वराज्य संस्था, मूलभूत अधिकार समजण्यास मदत होते. राजकीय नेतृत्व राजकीय पक्ष व इतर देशातील शासन व्यवस्थेची तुलनात्मक अभ्यास व विश्र्लेषण या विषयाच्या माध्यमातून करता येते या विषयात राजकीय नेता वकील नागरी सेवा पत्रकार राजकीय विश्र्लेषक शिक्षक प्राध्यापक इत्यादी असे अनेक पर्यायातून करिअर करता येते.

तत्त्वज्ञान हा विषय भारतीय संस्कृतीच्या ज्ञानाचे भांडार आहे. यामध्ये भारतीय व पाश्र्चात्य विचारवंतांचे विचार अभ्यासता येतात. हा विषय विद्यार्थ्यांच्या विचारांना एक सकारात्मक दिशा देतो. जीवनात नैतिकता सत्य याविषयी सखोल मार्गदर्शन करतो. चिकित्सक विचार करायला लावतो या विषयाचे संशोधक नागरी सेवा, शिक्षक, प्राध्यापक, समुपदेशक, कथाकार, लेखन, संवादक क्षेत्र, प्रेरणादायी वक्ता असे अनेक करिअरचे पर्याय उपलब्ध होतात.

भूगोल या विषयांमध्ये पृथ्वीची जडणघडण नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती, उपाय, हवामान, पर्यावरण इत्यादी आवश्यक संकल्पना या विषयात शिकवल्या जातात. नागरी नियोजन, हवामान शास्त्र, पुरातत्व शास्त्र, जीआयएस सारख्या क्षेत्रात करिअरच्या मोठ्या संधी उपलब्ध असतात. समाजशास्त्र विषय शिकताना प्राप्त झालेल्या दृष्टीमुळे जर स्वतःच्या जीवनाचे समाजशास्त्र उलगडले तर विद्यार्थ्यांच्या जीवनात मुळापासून बदल होऊ शकतो. समस्यांच्या अभ्यासामुळे सामाजिक जाणीव विकसित होते व विद्यार्थी समाजातील जबाबदार नागरिक म्हणून तयार होतात. या विषयाचे शिक्षणामुळे समाजसेवक, संशोधक गैरशासकीय संघटनांमध्ये कार्याची संधी, प्रशासकीय सेवा, शिक्षक, प्राध्यापक, धोरण निर्मितीमध्ये सहभाग इत्यादी अमर्याद संधी उपलब्ध होतात. मराठी भाषा ही आपली मातृभाषा असल्याने प्रत्येक विद्यार्थी व नागरिकाला या भाषेचे ज्ञान आवश्यक आहे मराठी भाषेमुळे आपण आपल्या मातीशी व संस्कृतीशी संलग्नित राहतो. मराठी भाषेचे ज्ञान विद्यार्थ्यांमध्ये विचार करण्याची योग्य पद्धत विकसित करते. मराठी भाषेच्या शिक्षणामुळे शिक्षक, प्राध्यापक, अनुवादक वृत्त संपादक, चित्रपट, नाट्यसमीक्षक, लेखन, स्पर्धा परीक्षेमध्ये करिअरच्या अमर्याद संधी उपलब्ध आहे.

हिंदी भाषा ही भारताची राजभाषा आहे. या भाषेच्या शिक्षणामुळे देशातील विविध भागांशी संवाद साधता येतो. तसेच मीडिया, सिनेमा, राजकारण या क्षेत्रांमध्येही हिंदीचा मोठा प्रभाव आहे. तसेच हिंदी भाषेतून उपलब्ध असलेल्या असलेले दर्जेदार साहित्य व ज्ञान अर्जित करायचे असेल तर हिंदी भाषेवर प्रभुत्व असावे लागते. या भाषेच्या ज्ञानाने शिक्षक, प्राध्यापक, पत्रकार, अनुवादक जाहिरात क्षेत्र व स्पर्धा, परीक्षेच्या असंख्य संधी उपलब्ध आहेत.

इंग्रजी ही आंतरराष्ट्रीय भाषा आहे. जागतिक स्तरावर संवादासाठी आवश्यक आहे ही केवळ एक भाषा नाही तर कौशल्य आहे. इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असल्यावर इंटरनेट, विज्ञान तंत्रज्ञानाचा उपयोग प्रभावशालीपणे करता येतो. या भाषेचे शिक्षणामुळे कॉर्पोरेट क्षेत्र, पर्यटन, शिक्षक, प्राध्यापक, अनुवादक, जाहिरात क्षेत्र, लेखन व स्पर्धा परीक्षा करिअरच्या मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध आहेत.

**कलेचे महत्त्व**

कला धरित्री मानवानां भूषणम्। कलाहीनः नरः पशुभिः समानः।। याचा अर्थ कला साहित्य हे मानवाचे खरे दागिने आहेत. जो कलाहीन आहे. तो पशु समान आहे. आजकाल युवा पिढीमध्ये सामाजिक माध्यमांच्या प्रभावामुळे मनाची एकाग्रता कमी होताना दिसत आहे. बहुतांशी तरुण पिढी असंवेदनशील बनताना दिसत आहे. योग्य-अयोग्य यातील भेद दाखवणारी विवेक बुद्धी जागृत ठेवण्यासाठी तरुणांमध्ये सकारात्मक भावना प्रवाहित ठेवण्यासाठी आपल्या भारतीय शास्त्रांमध्ये ६४ कलांचा उल्लेख केलेला आहे. ललित कला, चित्रकला, संगीत, नाटक, नृत्यकला, वाद्य इत्यादी कोणतीही कला मानवी जीवन अधिक समृद्ध व सुंदर बनवते. कला ही केवळ मनोरंजनासाठी नसून व्यक्तीच्या भावना, विचार व्यक्त करण्याचे प्रभावी माध्यम आहे. कलेमुळे मनाला आनंद मिळतो, कारण कला सादरीकरणातून व कलेचा आस्वाद घेण्यातून मेंदूमध्ये आनंदी संप्रेरके जे न्यूरो ट्रान्समीटर व रसायने निर्माण होतात ज्यांना डोपामीन, सेरेटोनिन, ऑक्सिटोसिन आणि एंडोर्फिन नावाने ओळखले जाते. या हॅप्पी हार्मोन्समुळे मेंदूची स्मरणशक्ती व कार्यक्षमता वृद्धिंगत होते. कलाविष्कारांमुळे आजचा तरुण वर्ग डिप्रेशन स्ट्रेस या शब्दांपासून लांब राहील.आज संगीतोपचार म्युझिक थेरपी ही जागतिक स्तरावर अनेक असाध्य रोगांवर रामबाण उपाय म्हणून प्रयोगात आणली जात आहे.

**कला शाखेतून काय साध्य करता येईल?**

कला शाखेत विद्यार्थ्यांना उत्कृष्ट संघटक, प्रशासकीय अधिकारी, संशोधक, शिक्षक, प्राध्यापक, लेखक, पत्रकार, समाजसेवक, कायदेतज्ञ, न्यायाधीश, मानसोपचार तज्ज्ञ, विचारवंत राजनेता, कलाकार, समुपदेशक अनुवादक, धोरण विश्र्लेषक, राजकीय समीक्षक असे अनेक पैलूंनी घडवण्याची क्षमता असते. त्यामुळे अनेक नामावंत सामाजिक संघटना, पोलीस प्रशासन, संशोधन करणाऱ्या संस्था खखडएठ असे इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स, कॉर्पोरेट रिसर्च केंद्र व राज्यातील प्रशासकीय यंत्रणेत, डेटा ॲनालिस्ट, पर्यटन, समुपदेशन, मार्गदर्शन, सोशल मीडिया, व्यवस्थापन, शासकीय व खाजगी क्षेत्र, लेखन आकाशवाणी व दूरचित्रवाणी निवेदक म्हणून कला शाखेतील विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात मागणी आहे.

वाचकांना हा लेख वाचताना कला शाखेतील आणखी दहा वीस क्षेत्रे नक्कीच आठवत असतील त्यामुळे फक्त गरज आहे. कला शाखेकडे पाहण्याचा दृष्टिकोन परिवर्तित करण्याची, शिस्तबद्ध अभ्यासाची व योग्य मार्गदर्शनाची.

कला शाखा म्हणजे फक्त अभ्यास नाही तर जीवन ही तिची प्रयोगशाळा आहे. कला शाखेमुळे विद्यार्थ्यांमधील कल्पकता व संशोधन वृत्ती वृद्धिंगत होते. त्यामुळे समाजातील समस्या समजून त्यावर उपाय शोधू शकतात. या शाखेमध्ये विद्यार्थ्यांना अध्यात्म, समाज, संस्कृती व मूल्ये यांची चांगली समज निर्माण होते. विद्यार्थ्यांची विचारशक्ती व संवाद कौशल्य सुधारते त्यामुळे त्यांचा आत्मविश्र्वास बळावतो. आजच्या डिजिटल इंडियामध्ये माणुसकी जपणारा भारत जतन करायचा असेल तर अधिकाधिक युवकांनी कला शाखेची निवड करावी व स्वतःचे व्यक्तिमत्व घडवून भारत मातेचे संरक्षण करण्यास सहभागी व्हावे.



आजच्या कृत्रिम बुद्धिमत्ता ए.आय.च्या, माहिती तंत्रज्ञानाच्या काळातही कला शाखेचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत चालले आहे. सर्व क्षेत्रात आपण कितीही प्रगती केली तरी माणूस म्हणून माणसाशी कसे वागावे, मानवी मूल्यांची जोपासना कशी करावी, समाज परिवर्तनामध्ये आपले कोणते योगदान असावे, राष्ट्रनिर्माण साठी आपलेही योगदान असावे याची व इतर नैतिक जीवन मूल्यांची शिकवण ही शाखा देते त्यामुळे आजही मानव्य विद्याशाखेच्या शिक्षणाची नितांत गरज आहे.

**डॉ. गीता गिरवलकर (शर्मा)**
**विभाग प्रमुख**
**लोकप्रशासन विभाग**
**महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर**
**९५०३१०९६४४**

## संक्षिप्त...

### ८ लग्न पचवले, नवव्या लग्नात तरुणीचे बिंग फुटले; बीडमध्ये नवऱ्या मुलाकडून लाखो लुटणाऱ्या नवरीसह एजंटाला बेड्या

**बीड/प्रतिनिधी** : सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढ्यात काही दिवसांपूर्वी एक धक्कादायक विवाह फसवणुकीचा प्रकार समोर आला होता. गुजरातमधील एका नवरीने खोटी ओळख सांगून आणि आधीच लग्न झालेलं असताना दुसऱ्यांदा विवाह करून नवरदेवाची लाखो रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप करण्यात आला. याप्रकरणात नवरी कुसुमबेन घाटाड, तिची आई नजमा मोमीन, बहीण सादिया शेख आणि अल्पवयीन भाऊ यांच्यासह एजंट असलेल्या सुरेखा सूर्यवंशी हिच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आता, बीड (ॉ।) जिल्ह्यातही अशाच बोगस लग्न लावणाऱ्या टोळीचा पर्दाफाश झाला आहे. विशेष म्हणजे, आठ लग्न पचवल्यानंतर नवव्या लग्नावेळी या वधुचे बिंग फुटले आणि पोलिसांच्या बेड्या पडल्या.

बीड जिल्ह्यात बोगस लग्न लावून देणारी टोळी सक्रीय असल्याचं समोर आल आहे. यापूर्वीही ग्रामीण भागातील अनेक तरुणांची फसवणूक या बोगस लग्न लावणाऱ्या टोळीने केली आहे. मात्र, असाच प्रकार बीडच्या उमापूर गावातून समोर आला असून नवरी एक अन् नवरदेव अनेक असे म्हणण्याची वेळ आली आहे. येथील उमापूर गावातील एका युवकाची बोगस लग्न लावणाऱ्या टोळीने लाखो रुपयांची फसवणूक केली. एकाच मुलीचे अगोदर आठ नवरदेवांसोबत लग्न लावण्यात आले. मात्र, पैशासाठी पुन्हा उमापूर येथील नवव्या नवरदेवासोबत एजंटकडून लग्न लावून देण्यात आले. दरम्यान, हे लग्न लावण्यासाठी, जुळवण्यासाठी नवऱ्या मुलाकडून लाखो रुपयांची रक्कम घेतली होती, लाखोंची फसवणूक केली आहे. याप्रकरणी बीडच्या चकलांबा पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली असून पीडित नवरदेव योगेश शिंदेने असून पोलीस अधीक्षकांकडे धाव घेत न्याय मागितला.

### अश्लील फोटो अन व्हिडिओ काढून उच्चशिक्षित तरुणीला ब्लॅकमेल केले, ८ लाख रोख अन् ९० ग्रॅम सोनंह

**जळगाव/प्रतिनिधी** : चाळीसगावमध्ये एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. मैत्रीच्या नावाखाली एका तरुणाने उच्चशिक्षित तरुणीशी जवळीक साधत तिचे अील फोटो व व्हिडिओ काढून तिला ब्लॅकमेल करत तिच्याकडून तब्बल ८ लाख १२ हजार रुपये आणि ९० ग्रॅम सोने उकळल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी चाळीसगाव शहर पोलिस ठाणे (येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

नेमकं प्रकरण काय ?

मिळालेल्या माहितीनुसार, चाळीसगाव शहरातील एक २४ वर्षीय तरुणी एमडीएसचे शिक्षण घेत आहे. संशयित यश महेंद्र जैन याच्याशी २०२२ मध्ये तिची ओळख झाली. पुढे या ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले. काही काळानंतर आरोपीने तरुणीला भेटण्याची मागणी केली. मात्र, तरुणीने नकार दिल्यानंतर त्याने व्हिडिओ कॉलदरम्यान काढलेले तिचे अश्लील फोटो व व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देत तिला ब्लॅकमेल करण्यास सुरुवात केली.

धमक्यांमुळे घाबरलेल्या तरुणीकडून आरोपीने वेळोवेळी मोठी रक्कम उकळली. इतकेच नव्हे तर तिच्याकडून ८ लाख १२ हजार रुपये रोख आणि ९० ग्रॅम सोनेही घेतल्याचे समोर आले आहे. आरोपीने तरुणीला मारहाण केल्याचाही आरोप आहे.

पीडित तरुणीच्या फिर्यादीवरून चाळीसगाव शहर पोलिस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले आहे. दरम्यान, आरोपीचे कॉलेज परिसरात आईस्क्रीम पार्लर असल्याची माहिती समोर आली असून या प्रकारात इतर मुलींचीही फसवणूक झाली आहे का, याचा पोलिसांकडून तपास सुरू आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक अमितकुमार मनेळ यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

तर दुसरीकडे जळगाव शहरातील एटीएम केंद्रांवर नागरिकांचे लक्ष विचलित करून त्यांच्या खात्यातून पैसे लांबवणाऱ्या आंतरजिल्हा टोळीचा जळगाव स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. याप्रकरणी एकाला धुळे येथून ताब्यात घेण्यात आले असून, त्याच्याकडून २ लाख ३१ हजार रुपयांच्या फसवणुकीचा गुन्हा उघडकीस आला आहे. या गुन्ह्यातील त्याचा दुसरा साथीदार मात्र अद्याप फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

### सरकारी शाळा सीबीएसई करण्याचा वाद तीव्र; राज्य शिक्षण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्यातील सरकारी शाळांचे 'सीबीएसई'करण करण्याचा निर्णय सध्या वादाचा विषय ठरत आहे. महापालिका आणि जिल्हा परिषदांनी घेतलेल्या या निर्णयामुळे महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याची चर्चा होत आहे. स्वत:च्या शिक्षण व्यवस्थेलाच दुय्यम स्थान देण्याचा हा प्रकार असल्याची टीका विविध स्तरांतून होत आहे. मात्र, शिक्षण आयुक्तांनी मातृभाषेतील शिक्षणाच्या महत्त्वावर भर देत राज्य मंडळाच्या सक्षमतेचा पुनरुच्चार केला असून या प्रक्रियेला विरोध दर्शवला आहे. महापालिका आणि जिल्हा परिषदांच्या शाळांचे 'सीबीएसई'करण होत असल्याने राज्याच्या शिक्षण व्यवस्थेवरच प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. या पार्श्वभूमीवर शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी स्पष्ट भूमिका मांडत, 'राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा 'सीबीएसई'शी संलग्न न करण्याची शिफारस राज्य शासनाकडे करण्यात येणार आहे,' असे सांगितले आहे. त्यांच्या या भूमिकेमुळे सरकारी शाळांचे 'सीबीएसई'करण पुढे होणार नसल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

राज्यातील शिक्षण क्षेत्रात शासकीय, अनुदानित आणि खासगी अशा विविध प्रकारच्या शाळा कार्यरत आहेत. गेल्या काही वर्षांत खासगी शाळांचा 'सीबीएसई'कडे ओढा लक्षणीयरीत्या वाढलेला दिसून येतो. अनेक जुन्या आणि नामांकित शाळांनी राज्य मंडळाशी असलेले संलग्नत्व सोडून 'सीबीएसई'चा मार्ग स्वीकारला आहे. त्यानंतर महापालिका आणि जिल्हा परिषदांच्या शाळांनीही 'सीबीएसई'शी संलग्न होण्यास सुरुवात केली आहे.

# चिमुकल्या हातांची मोठी झेप: साडेसहा वर्षांच्या ईशाने दिला पर्यावरणासोबत माणुसकीचा संदेश

**ठाणे:** पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी केवळ वय नाही, तर संवेदनशील मन आणि संस्कारांची गरज असते, हे ठाण्यातील ईशा संदीप मोरे या ६.५ वर्षांच्या चिमुकलीने सिद्ध करून दाखवले आहे. ईशाने तिचे आई-वडील कविता आणि संदीप मोरे यांच्यासोबत भेट देऊन 'प्रकल्प आशादायी' (Project -ashayein) उपक्रमासाठी स्वतः जमा केलेल्या ५१ NWPP (नॉन-वोव्हन) पिशव्या सुपूर्द केल्या.






**कुटुंबाचा सहभाग: खऱ्या जागरूकतेची सुरुवात**

ईशाचे हे पाऊल केवळ पिशव्या जमा करण्यापुरते मर्यादित नाही, तर ते 'REACH' (जबाबदारी, सहानुभूती, जागरूकता, करुणा आणि सुसंवाद) या मूल्यांचे जिवंत उदाहरण आहे. जेव्हा कविता आणि संदीप मोरे यांच्यासारखे पालक आपल्या मुलांना अशा उपक्रमात सहभागी करून घेतात, तेव्हा खऱ्या अर्थाने समाज बदलतो. पर्यावरण रक्षण हा केवळ सरकारचा विषय नसून, घरातील प्रत्येक सदस्याने त्यात वाटा उचलणे हाच खऱ्या जागरूकतेचा आणि समस्येवरचा खरा उपाय आहे.

**काय आहे 'प्रकल्प आशादायी'?**

हा ठाणे जिल्हा प्रशासनाचा एक पथदर्शी (Pilot) प्रकल्प असून तो विजयकुमार कट्टी (संस्थापक, वेसॅक इंडिया) यांच्या संकल्पनेतून साकार झाला आहे. या मोहिमेला मनोज सानप (जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे) यांचे सक्रिय सहकार्य लाभले असून, ठाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ I.A.S. यांनी याला विशेष पाठबळ दिले आहे.

**या मोहिमेची मुख्य उद्दिष्टे:**

प्लास्टिक मुक्ती: या पिशव्यांचा पुनर्वापर करून ६२.५ टन एकेरी वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकला (Single-use plastic) प्रतिबंध करणे.

दुसरे आयुष्य (डशलेपव डळषश): घराघरातील अडगळीत पडलेल्या छथझझ पिशव्यांना पुन्हा चलनात आणून 'ठएणडए' संकल्पना राबवणे.

मुळापासून प्लास्टिक बंदी आणि आर्थिक बचत: जेव्हा आपण या जमा झालेल्या पिशव्या लहान विक्रेत्यांना देतो, तेव्हा ते मुळातूनच प्लास्टिक पिशव्यांची खरेदी थांबवू शकतात. यामुळे त्या लहान व्यापाऱ्यांची दरमहा २,००० ते २,५०० रुपयांची बचत होते, जी त्यांच्या कुटुंबासाठी मोठा आधार ठरते.

ईशाच्या योगदानाचे पर्यावरण मूल्य (Impact Scorecard) सोबत जोडलेल्या 'प्रशस्तीपत्र आणि इम्पॅक्ट स्कोरकार्ड' मधील माहितीनुसार, ईशाच्या ५१ पिशव्यांनी पर्यावरणावर पुढील सकारात्मक परिणाम साधला आहे:

१२.७५ किलो एकेरी प्लास्टिकचा वापर टाळला.

औद्योगिक प्रक्रियेतील २,२९५ लिटर पाण्याची बचत झाली.

७६.५ किलो CO2e उत्सर्जनाचे प्रमाण कमी झाले.

एका वर्षात ३.८३ पूर्ण वाढलेली झाडे जेवढा कार्बन शोषतात, तेवढी मदत निसर्गाला झाली.

एका 'सामान्य माणसाचे' आवाहन सोबतच्या दुसऱ्या छायाचित्रात ईशाचा आनंदी चेहरा आणि तिने जमा केलेल्या पिशव्या पाहून आपल्याला हे उमजते की, बदल आपल्यापासूनच सुरू होतो. मी एक 'सामान्य माणूस' म्हणून सर्व ठाणेकरांना विनंती करतो की, आपणही ईशाचा आदर्श घेऊन आपल्या घरातील अशा पिशव्या या मोहिमेसाठी दान कराव्यात. आपली ही छोटीशी मदत आणि काळजी एखाद्या लहान व्यापाऱ्याचा मोठा आर्थिक आणि मानसिक आधार बनू शकते.

**छोटे कृती, मोठा बदल.**

चला, आपण सर्व मिळून २५०,००० पिशव्यांचे ध्येय गाठूया आणि ठाण्याला प्लास्टिकमुक्त आणि अधिक हरित बनवूया!

– विजयकुमार कट्टी
संस्थापक, वेसॅक इंडिया (VesacIndia)

# कॅनमधून पेट्रोल-डीझेल विक्री करणाऱ्या दोन पेट्रोल पंपांचा पुरवठा निलंबित

## जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानंतर 'एचपीसीएल'ची मोठी कारवाई

**लातूर/प्रतिनिधी** : जिल्ह्यातील काही पेट्रोल पंपांवर नियमांचे उल्लंघन करून कॅन आणि बॅरलमध्ये पेट्रोल-डिझेलची विक्री होत असल्याचे व्हिडीओ व्हायरल झाले होते. तसेच याबाबत जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांना भ्रमणध्वनीद्वारे तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयाने पाठविलेल्या पत्राची दखल घेत हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडने जिल्ह्यातील दोन पेट्रोल पंपांचा इंधन पुरवठा तात्काळ प्रभावाने निलंबित केला असून या पंपांची लवकरच सखोल चौकशी केली जाणार आहे.

लातूर जिल्ह्यातील काही पेट्रोल पंपांवर ग्राहकांना जार, कॅन किंवा बॅरलमध्ये डिझेल आणि पेट्रोल दिले जात असल्याच्या तक्रारी जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांना प्राप्त झाल्या होत्या. जिल्हाधिकाऱ्यांनी निर्गमित केलेल्या आदेशानुसार, अशा प्रकारे सुट्या स्वरूपात इंधन विक्री करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. या नियमाचे उल्लंघन होत असल्याची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाने एचपीसीएल कंपनीला दिली.

या तक्रारींची दखल घेत एचपीसीएल मंत्री पेट्रोलियम आणि रजनी पेट्रोलियम या दोन रिटेल आउटलेट्सवर कारवाई केली आहे. 'एचपीसीएल'च्या विक्री अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, या दोन्ही पेट्रोल पंपांचा इंधन पुरवठा सध्या थांबवण्यात आला आहे. तेल कंपन्यांच्या मार्केटिंग डिसिप्लिन गाईडलाईन्स नुसार या दोन्ही केंद्रांची सविस्तर तपासणी करण्यात येईल आणि त्यानंतर पुढील कायदेशीर पावले उचलली जातील, असे त्यांनी कळविले आहे. लातूर जिल्ह्यात पेट्रोल-डीझेल विक्रीबाबत नियमावली लागू करण्यात आली आहे. सुरक्षिततेच्या कारणास्तव कॅन किंवा बॅरलमध्ये पेट्रोल-डीझेल नेणे धोकादायक असल्याने जिल्हा प्रशासनाने यावर बंदी घातली आहे. जर इतर कोणत्याही पेट्रोल पंपावर असे नियमबाह्य प्रकार आढळून आले, तर त्यांच्यावरही अशाच स्वरूपाची कारवाई करण्यात येईल, असा इशारा जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत देण्यात आला आहे.

# बाप की हैवान ? निर्दयी बापाचा लेकींना पेटवून देण्याचा प्रयत्न

**बीड/प्रतिनिधी** : बीडमध्ये एक थरारक घटना समोर आली आहे. बाप की हैवान असा प्रश्न पडावा अशी ही घटना. बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यात एक संतापजनक घटना घडली आहे. माजलगावमधील लहामेवाडी येथे पत्नी नांदायला येत नसल्याच्या रागातून एका निर्दयी पित्याने स्वत:च्याच दोन पोटच्या मुलींच्या अंगावर डिझेल ओतून त्यांना जिवंत जाळण्याचा प्रयत्न केलाय. महेश सोमासे असे आरोपी पित्याचे नाव आहे.

ऑनलाइन सट्ट्याच्या नादात महेशने ५ एकर जमीन गमावली

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, २०१९ मध्ये पीडित अश्विनी सोमासे यांचा विवाह महेश सोमासे याच्याशी झाला होता. सुरुवातीची दोन-तीन वर्षे सुखात गेले मात्र नंतर महेशला ऑनलाइन सट्ट्याचा नाद लागला. नाद एवढा की या नादात त्याने घराची पाच एकर शेती गमावलीच पण उरलेली सात एकर जमीन आपल्या नावावर करण्यासाठी पत्नीकडे तगादा लावला. एवढ्यावरच तो थांबला नाही तर पत्नीला माहेरून पैसे आणण्याचा तगादा लावत त्याने तिला मारहाण करायला देखील सुरुवात केली. या छळाला कंटाळून अखेर अश्विनी आपल्या दोन मुलींसह माहेरी लहामेवाडीत रहायला आल्या.

घटनेच्या दिवशी काय घडलं ?

२ मे रोजी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास महेश सोमासे दुचाकीवरून लहाम ेवाडीत सासरच्या घरी पोहोचला. पत्नीला 'नांदायला चल' म्हणत त्याने अश्विनीला धमकावण्यास सुरुवात केली. पत्नीने जाण्यास नकार दिला, तेव्हा महेशचा राग अनावर झाला. धक्कादायक म्हणजे आपल्यासोबत आणलेले डिझेल दोन्ही लहान मुलींच्या अंगावर ओतले आणि त्यांना पेटवून देण्याचा त्याने प्रयत्न केला. हे पाहताच मुलींच्या आजी-आजोबांनी आणि शेजाऱ्यांनी आरडाओरडा करत मुलींना बाजूला ओढले, ज्यामुळे सुदैवाने चिमुकल्या मुलींचे प्राण वाचले.

तो उद्या आमच्या लेकीचं काय करेल

# भारतीय बौद्ध महासभा सिवुडस (प) शाखेच्या वतीने विश्ववंदणीय तथागत बुद्धांचा २५७० वा जयंती महोत्सव सोहळा यशस्वीरित्या संपन्न

**नवी मुंबई / के. एच. हनवते :** भारतीय बौद्ध महासभा नवी मुंबई जिल्हाअंतर्गत सिवुडस (प ) शाखेच्या वतीने सिवुडस शाखेचे अध्यक्ष मा. जिवक तथा जिवन वाडते गुरुजी – केंद्रिय शिक्षक तद्वतच पालीभाषा अभ्यासक ) यांच्या अध्यक्षतेखाली विश्ववंदनीय तथागत बुध्दांचा २५७० वा बुद्धजयंती महोत्सव मोठ्या हर्षो ल्हासात साजरा करण्यात आला. पहिल्या सत्रात सकाळी ७ वाजता अनापान व ध्यानसाधना साधकांच्या उपस्थितीत घेण्यात आली.

सकाळी ८ वाजता मा . जिवन वाडते गुरुजी अध्यक्ष – सिवुडस शाखा यांच्या हस्ते धम्म ध्वजा रोहन करण्यात आले समता सैनिक दल बटालियनने सलामी दिली, मधुकर हिवराळे गुरुजी ( मेजर जनरल ) मंगलताई सुर्वे ( असि. डिव्हीजन ऑफीसर ) व इतर उपस्थित सैनिक अधिकारी व पुरुष व महिला सैनिकांनी कड़क सलामी दिली. सकाळ अधिवेशनात मा. सुनिताताई बोरकर ( पालीभाषा अभ्यासक ) यांनी आधुनिक जिवन आणि जातक कथा या विषयावर मार्गदर्शन केले, डॉ. मिताताई गंगावणे ( सचिवा पर्यटन म.रा. महिला शाखा ) यांनी शुभेच्छा दिल्या नंतर वंदणीय भन्ते काश्यप यांची अप्रतिम धम्मदेसना झाली, खिरदान आयुनि सुरेखाताई इंगळे यांनी केले. व अल्पोपहार आयुनि अर्चनाताई बोदडे यांनी केले.

तद्नंतर संध्याकाळच्या सत्रात विभागातील सर्व धम्म उपासक आणि उपासिकांच्या उपस्थितीत ठिक ७ ते ८.३० वाजेपर्यंत संपुर्ण विभागात रथातुन विश्ववंदनीय, तथागत भगवान गौतम बुद्ध , प्रियदर्शी सम्राट अशोक, भारतरत्न डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैल चित्रांची भव्य धम्म रॅली काढण्यात आली. चलो बुद्ध की ओर ! जग मे बुद्ध का नाम है ! यही तो भारत की शान है !घोषणांचा जयघोष करून त्याचप्रमाणे आमच्या बौध्दांच्या अस्मितेचे केंद्र असलेले बुद्धगया येथील महाबोधी महाविहार आमच्या बौद्ध बांधवांच्या ताब्यात त्वरीत मिळाले पाहीजे असा सामाजिक संदेश भव्य धम्म रॅलीतुन विभागातील नागरीकांना देण्यात आला. तद्नंतर गणेश मैदान सेक्टर – ४८ च्या भव्य प्रांगणात शुक्रवार दिनांक ०१/०५ / २०२६ रोजी सायंकाळी जयंतीदिनी सर्वप्रथम आदर्शांची पुजा करण्यात आली, सामुहिक त्रिसरण पंचशील घेण्यात आले.

समता सैनिक दल नवी मुंबई जिल्हा संध्याकाळच्या सत्रात अशोक गमरे गुरुजी ( सिनियर डिव्हीजन ऑफीसर ), अजाबराव वानखडे गुरुजी ( सिनियरडिव्हीजन ऑफीसर ) दिपक कांबळे गुरुजी ( कंपनी कमांडर व इतर अधिकारी पुरुष व महिला सैनिकांनी उपस्थित धम्म पिठावरील मान्यवरांना कडक सलामी दिली, या जयंती महोत्सवासाठी प्रामुख्याने उपस्थित मुख्य अतिथी नवी मुंबई जिल्हा पदाधिकारी



व धम्म पिठावरील मान्यवरांचे सिवुडस शाखेच्या वतीने स्वागत करण्यात आले.

मुख्य अतिथी व प्रमुख मार्गदर्शक म्हणुन भारतीय बौद्ध महासभा महाराष्ट्र राज्याचे सचिव – संस्कार आदरणीय डॉ . रविंद्र गवई साहेब यांनी विश्ववंदनीय तथागत भगवान गौतम बुद्धांच्या जीवन कार्यावर अप्रतिम मार्गदर्शन केले. महाकारुणीक तथागत भगवान गौतम बुध्दांचा २५७० वा जयंती महोत्सव धुमधडाक्यात गणेश मैदान सेक्टर – ४८ येथे मोठ्या हर्षोल्हासात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी भारतीय बौद्ध महासभा नवी मुंबई जिल्ह्याचे सरचिटणीस आदरणीय संजय झनके गुरुजी यांनी हा सोहळा यशस्वी करण्यासाठी परवानगी घेण्यापासुन ते धम्म दान संकलीत करण्यापर्यंत कार्यक्रमाच्या शेवटपर्यत सिवुडस शाखा पदाधिकाऱ्यांना खूप मोलाचे सहकार्य केले सदर कार्यक्रमात आद.

प्रकाश भालेराव ( उपाध्यक्ष – संस्कार ) आ. दत्तात्रय हराळ ( कार्यालयीन सचिव ) धम्म पिठावर आवर्जुन उपस्थित होते विष्णू वाघमारे ( सरचिटणीस – सिवुडस शाखा, बबन पवार ( कोषाध्यक्ष – सिवुडस शाखा ) धम्मशिला वाढवे ( अध्यक्षा – महिला शाखा करावेगांव ) प्रमिला जाधव (संरक्षण – सचिव नवी मुंबई जिल्हा महिला कार्यकारिणी ) उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी विभागातील आंबेडकर चळवळीचे कार्य करणाऱ्या विविध संस्थाचे पदाधिकारी उपस्थित होते.

पत्रकार मा.कल्याणराव हणवते, मुंबई दुरदर्शन वरळी येथील सहाय्यक निर्माता मा. संजय झनके प्रामुख्याने उपस्थित होते हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी ॲड उमेश हातेकर ( अध्यक्ष बेलापुर तालुका वंचित बहुजन आघाडी. पुजाताई हातेकर ( समाजसेवक ), ॲड. संदेश मोरे ( वकील – हायकोर्ट ), राहुल जाधव ( मा . जिल्हाध्यक्ष वंचित बहुजन आघाडी माथाडी टान्सपोर्ट नवी मुंबई ) प्रकाश मनोहर ( मा. निरीक्षक वंचीत बहुजन आघाडी ), राहुल शिरसाट (महासचिव), तसेच कल्याणराव हनवते (मा. उपाध्यक्ष बेलापूर तालुका ( वंचित बहुजन आघाडी ), वसंत हानवते (उद्योजक), भारतीय बौद्ध महासभा नेरुळ शाखा : सूर्यकांत सव्वाखंडे सदर कार्यक्रमास उपस्थित होते. बुद्ध जयंती महोत्सवानिमित्त आयोजित केलेल्या चित्रकला स्पर्धा व रांगोळी स्पर्धकांना डॉ. रविंद्र गवई यांच्या हस्ते व धम्मपिठावरील उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व ट्रॉफी देवुन त्यांचा सत्कार करण्यात आल. अध्यक्षीय समारोप भाषण जिवन वाडते गुरुजी अध्यक्ष – सिवुडस शाखा यांनी केले. बुद्ध जयंती महोत्सव सोहळ्याचे उत्कृष्ट सुत्रसंचालन मा. अनघाताई जाधव ( सुप्रसिद्ध निवेदिका ) यांनी केले. व आभारप्रदर्शन डॉ. संतोष कुसरे यांनी केले. सरणत्तय घेवुन बुद्ध जयंती महोत्सव सोहळ्याचा समारोप करण्यात आला सर्वांसाठी शानदार भोजनाची व्यवस्था करण्यात आली.

# बिटरगाव नगरीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती जल्लोषात साजरी

**रेणापूर/प्रतिनिधी** : २९ एप्रिल रोजी मौजे बिटरगाव येथे परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वा जयंती उत्सव मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्यात आला, सकाळच्या सत्रात पंचशील झेंडा वंदन मान. महेंद्र पाटील (सरपंच बिटरगाव) यांच्या शुभ हस्ते तसेच बुद्ध - बाबासाहेब यांच्या प्रतिमेचे पूजन आयु. पुष्पाताई शिंदे (डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र बार्टी पुणे), व पंचशील बुद्ध विहार महिला मंडळ बिटरगाव अध्यक्षा : आयु. स्वाती सरवदे, समाजसेवक : योगेश सातपुते, या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे बालासाहेब सरवदे (बौद्धाचार्य चैत्यभूमी दादर मुंबई) तसेच कल्याणराव हनवते (बौद्धाचार्य) यांनी विधिवत बुद्ध वंदना घेऊन कार्यक्रमाचे सुरुवात करण्यात आली, तद नंतर उपस्थित मान्यवरांचा सत्कार सोहळा झाल्यानंतर लहान बालक, बालिका यांचे वक्तृत्व स्पर्धा व गीत गायन झाले त्यानंतर कार्यक्रमाचे प्रस्ताविक : दयानंद सरवदे यांनी केले. उपस्थित अनेक मान्यवरांनी बाबासाहेबांचा जीवनमय संघर्ष आणि त्यांनी दिलेल्या घटनादिता अधिकारांचे महत्त्व पटवून सांगितले सदर कार्यक्रमाचे





अध्यक्षीय समारोप भाषण : कल्याणराव हनवते (पत्रकार - बौद्धाचार्य) यांनी केले असून या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन : कृष्णा वाघमारे यांनी केले.

सायंकाळच्या सत्रात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आथक प्रयत्नातून या देशाला भारताचे संविधानाची निर्मिती झाली आणि त्या संविधानामुळेच आज घडीला भारताचा सर्वांगीण विकास कसा झाला याचे तैल चित्र रथावर रेखाटले होते हा नयनरम्य सोळा पाहण्यासाठी मान. दीप रत्न निलंगेकर (दूरदर्शन प्रतिनिधी तथा संपादक दैनिक युतीचक्र), मान. डी. एल. वाघमारे (पोलीस क्राईम न्यूज), अशोक हनवते (दैनिक महावृत्त संपादक तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ जिल्हा सरचिटणीस), अँड. संतोष वाघमारे, प्राध्यापक : रमेश हनवते मुंबई सह अनेक मान्यवरांनी भव्य दिव्य मिरवणुकीत उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली त्याबद्दल पंचशील बुद्ध विहार जयंती उत्सव अध्यक्ष : विष्वनाथ वाघमारे, आकाश सरवदे यांनी सर्वांचे हार्दिक स्वागत करून कार्यक्रम स्थळी उपस्थित राहिल्याबद्दल आभार व्यक्त केले या भव्यदिवे मिरवणुकीत लहान थोर बालक-बालिका तथा युवा भीमसैनिकांनी शेकडोंच्या संख्येत सामील होऊन कार्यक्रमाची शोभा वाढवली.

विशेष म्हणजे लहान बालकांनी जयंती दिनी डॉ. बाबासाहेबांच्या गाण्यावरती डीजे साँग वर लेझीम पथकांनी नृत्य सादर करून सर्वांचे लक्ष केंद्रित केले, असा हा एक आगळा वेगळा जयंतीचा आकर्षण सोहळा प्रत्येक वर्षी सादर केला जातो, त्याबद्दल सर्वांना क्रांतिकारी सप्रेम जय भीम.

## विविध वृत्त...

### ऑटो चालक हनुमंत पितांबर लोखंडे यांचा प्रामाणिकपणा बौद्ध संस्कारांचे जीवंत उदाहरण



**लातूर/प्रतिनिधी** : आजच्या धावपळीच्या आणि स्वार्थप्रधान जगात प्रामाणिकपणा, माणुसकी आणि नैतिक मूल्ये जपणारी माणसे समाजासाठी प्रेरणास्थान ठरतात. अशाच एका प्रेरणादायी घटनेने लातूर परिसरात सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. ऑटो चालक हनुमंत पितांबर लोखंडे यांनी आपल्या प्रामाणिकपणाचा आणि बौद्ध संस्कारांचा सुंदर प्रत्यय समाजासमोर ठेवला.

हनुमंत लोखंडे यांच्या ऑटोमध्ये प्रवासादरम्यान निळूबाई श्रीमंत गफले या महिलेची पर्स विसरली गेली होती. त्या पर्समध्ये पाच हजार रुपये रोख रक्कम, कांही महत्त्वाची कागदपत्रे आणि इतर किमती वस्तू होत्या. अनेकदा अशा प्रसंगी वस्तू परत मिळण्याची आशा कमीच असते; मात्र हनुमंत लोखंडे यांनी अत्यंत जबाबदारीने आणि प्रामाणिकपणे त्या पर्सची तपासणी केली.

पर्समध्ये पेपरवर उपलब्ध असलेल्या मोबाईल नंबरच्या आधारे त्यांनी संबंधित महिलेशी संपर्क साधला. त्यानंतर वाहतूक शाखेचे पीएसआय माधव केंद्रे साहेब यांच्या हस्ते सदर पर्स निळूबाई गफले यांना सन्मानपूर्वक परत करण्यात आली. ही घटना केवळ हरवलेली वस्तू परत मिळण्यापुरती मर्यादित नव्हती, तर ती समाजाला नैतिकतेचा मोठा संदेश देणारी ठरली.

हनुमंत लोखंडे हे भारतीय बौद्ध महासभा, जिल्हा शाखा लातूर पश्चिमच्या समता सैनिक दलाचे पदाधिकारी आहेत. त्यामुळे त्यांच्या कृतीतून बौद्ध धम्मातील शील, करुणा, प्रामाणिकपणा आणि परोपकार यांचे जीवंत दर्शन घडले. तथागत भगवान बुद्धांनी सांगितलेल्या ''शील हेच खरे सौंदर्य'' या शिकवणीचे त्यांनी प्रत्यक्ष आचरण करून दाखवले.

बौद्ध धम्म माणसाला केवळ पूजा-अर्चा शिकवत नाही, तर सत्य, प्रामाणिकपणा, दया आणि समाजहिताची जीवनमूल्ये शिकवतो. हनुमंत लोखंडे यांच्या या कृतीतून हे स्पष्ट झाले की, खरे बौद्ध संस्कार हे वर्तनातून दिसतात. त्यांनी पैशांपेक्षा माणुसकीला अधिक महत्त्व दिले आणि समाजात आदर्श निर्माण केला.

या प्रेरणादायी कार्याबद्दल सर्वत्र त्यांचे कौतुक करण्यात आले. त्यांचा सत्कारही मोठ्या आदराने करण्यात आला. याप्रसंगी वाहतूक शाखेचे पोलीस सुग्रीव नागरगोजे, बाभळगावचे मस्के साहेब तसेच संपूर्ण टीम उपस्थित होती. तसेच ऑटो युनियनचे पवन कांबळे सेलुकर, कृष्णा डावखरे, महादेव हसबे, विकास मस्के, दत्ता ऐकले आदी मान्यवरांनीही उपस्थित राहून त्यांच्या कार्याचे अभिनंदन केले.

आज समाजाला अशाच प्रामाणिक, नैतिक आणि संस्कारित व्यक्तींची गरज आहे. हनुमंत लोखंडे यांच्यासारख्या व्यक्ती समाजातील तरुणांसाठी आदर्श आहेत. त्यांच्या कृतीतून हे पुन्हा सिद्ध झाले की, बौद्ध संस्कार म्हणजे केवळ विचार नव्हे, तर तो जगण्याचा मार्ग आहे.

### राक्षसी वृत्तीचा कारभार, फडणवीसांचे सरकार आपटावंच लागेल; जरांगे पाटलांचा हल्लाबोल, बंगालच्या निकालावरही संशय

**सोलापूर/प्रतिनिधी** : देशातील ५ राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल लागले असून भाजपने तीन राज्यात स्पष्ट बहुमताने सरकार स्थापन होईल, एवढे संख्याबळ मिळवले आहे. अवघ्या देशाचे लक्ष लागलेल्या पश्चिम बंगालमध्येही भाजपने द्विशतक ठोकत ममता दीदींच्या १५ वर्षाच्या सत्तेला सुरुंग लगावला आहे. भाजपने मोठ्या फरकाने बंगालमध्ये एकहाती सत्ता मिळवल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. तर, विरोधकांनी देखील भाजपच्या विजयावर एसआरए आणि ईडी, सीबीआयसारख्या संस्थांचा वापर करुन मतचोरी केल्याचं म्हटलं आहे. आता, मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनीही भाजपच्या विजयावर शंका उपस्थित केली आहे. तसेच, राज्यातील वाढत्या गुन्हेगारीवरूनही संताप व्यक्त करत, फडणवीसांचे सरकार आपटावेच लागेल, असेही म्हटले.

अकलूज येथील सकल मराठा मोर्चाचे समन्वयक धनाजी साखळकर यांच्या आईच्या मृत्यूनंतर जरांगे पाटील यांनी रात्री त्यांच्या घरी जाऊन सांत्वनपर भेट घेतली. त्यानंतर कार्यकर्त्यांशी बोलताना फडणवीस सरकारवर जोरदार निशाणा साधला. सध्या राज्यात वाढलेल्या गुन्हेगारीबाबत थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधताना हे असले रत्न आपल्याला लाभले आहेत, हे गुंडांना जेलम ध्ये एसी लावून देतात आणि मोबाईल फोन देतात. यांच्या काळात गुंडांचे चालणार आहे. फडणवीसांचे सरकार राक्षसी वृत्तीचे असून आता ते आपटावेच लागेल, असे म्हणत जरांगे पाटील यांनी राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला.

ज्याला विचारले ते म्हणतो मी यांना मतदान केले नाही, तरी हे जिंकतात. पश्चिम बंगालमध्ये ममता बाईला पाडले, पण लोक म्हणतात ममताबाई कधीच पडणार नाही. मला पहिल्यांदा वाटायचं काही नसेल पण आता नक्की काहीतरी भानगड आहे, त्यांनी कुठेतरी काड्या खोचून ठेवल्या आहेत, असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी भाजपच्या पश्चिम बंगाल आणि इतर राज्यातील विधानसभा निवडणुकांच्या विजयानंतर प्रतिक्रिया दिली. नुकत्याच झालेल्या निवडणुकीत भाजपाच्या विजयानंतर काँग्रेस नेते राहुल गांधी, तृणमूलच्या नेत्या ममता बॅनर्जी यांनी भाजपवर जोरदार टीका केली होती.

## छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा; लोगोचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते अनावरण

**मुंबई/प्रतिनिधी** : बदलापूर येथे १३ ते १७ मे याकाळात छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा होत असून या स्पर्धेचा आढावा आज उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला. यावेळी स्पर्धेच्या बोधचिन्हाचे अनावरण उपमुख्यमंर्त्यांच्या हस्ते करण्यात आले.

सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या या बैठकीस आमदार किसन कथोरे, कुळगांव- बदलापूर नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा रुचिता घोरपडे, उपमुख्यमंर्त्यांचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, क्रीडा विभागाचे उपसंचालक नवनाथ फरताडे, जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार, महाराष्ट्र व्हिलीबॉल असोसिएशनचे पदाधिकारी आदी उपस्थित होते. ठाणे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यावेळी दूरदृष्य प्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले होते.

१८ व २१ वर्षीय मुला मुलींसाठी ही राज्यस्तरीय स्पर्धा असून क्रीडा विभाग आणि कुळगाव बदलापूर नगरपरिषदेच्या माध्यमातून त्याचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धे साठीच्या आयोजन समितीचे अध्यक्ष जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. यावेळी बैठकीत खेळाडूंची निवास आणि भोजन व्यवस्था, मैदान तयारी, आरोग्य व्यवस्था आदी बाबींवर चर्चा करण्यात आली. खेळाडूंच्या निवासाची चांगली व्यवस्था करा त्यासाठी लागणार २५ लाखांचा निधी सिडकोच्या माध्यमातून देण्याचे निर्देश उपमुखमंर्त्यांनी यावेळी दिले. दरम्यान, यावेळी ठाणे विभागीय क्रिडा संकुलाबाबत देखील आढावा घेण्यात आला.

## प्रधानमंत्री इंटर्नशिप योजनेतून युवकांसाठी कौशल्य विकासाची संधी

**लातूर/प्रतिनिधी** : भारत सरकारच्या कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना अंतर्गत प्रायोगिक प्रकल्पाच्या विस्तारासाठी नवीन मार्गदर्शक तत्त्वे प्रसिद्ध केली आहेत. अर्थसंकल्प २०२४-२५ मध्ये घोषित केलेल्या या योजनेचा मुख्य उद्देश देशातील तरुणांना भारतातील अव्वल कंपन्यांमध्ये प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळवून देणे हा आहे. या प्रायोगिक प्रकल्पांतर्गत १ लाख १० हजार इंटर्नशिप संधी उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून हा प्रकल्प डिसेंबर २०२६ पर्यंत वाढवण्यात आला आहे.

इंटर्नशिपचा कालावधी हा संबंधित क्षेत्राच्या आणि कंपनीच्या गरजेनुसार ६ ते ९ महिने इतका असेल. यातील किमान अर्धा कालावधी हा प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी (ऑन-जॉब) व्यतीत करणे अनिवार्य आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी उमेदवाराचे वय १८ ते २५ वर्षे दरम्यान असावे. हायस्कूल, उच्च माध्यमिक उत्तीर्ण, आयटीआय प्रमाणपत्रधारक, पॉलिटेक्निक डिप्लोमा धारक किंवा पदवीधर बी.ए., बीएस. सी., बीकॉम, बीसीए, बी. फार्मा, बी.ई., बी. टेक. इत्यादी आणि पदव्युत्तर पदवी शैक्षणिक पात्रता असलेले उमेदवार पात्र आहेत. उमेदवार पूर्णवेळ नोकरीत नसावा किंवा पूर्णवेळ शिक्षण घेत नसावा.

आयआयटी, आयआयएम, आयआयएसईआर, एनआयडी सारख्या नामांकित संस्थांमधील पदवीधर, तसेच सीए, सीएस,एमबीबीएस, एमबीए, पीएचडीधारक या योजनेसाठी पात्र नाहीत. तसेच, ज्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न १२ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे किंवा ज्यांच्या कुटुंबातील सदस्य कायमस्वरूपी सरकारी कर्मचारी आहेत, ते या योजनेचा लाभ घेऊ शकत नाहीत. ही योजना थेट लाभ हस्तांतरण डीबीटी तत्त्वावर आधारित असून उमेदवारांना दरमहा ९ हजार रुपये मानधन दिले जाईल. यामध्ये कंपनीचा वाटा ९०० रुपये असेल, तर सरकार ८ हजार १०० रुपये थेट उमेदवाराच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करेल. इंटर्नशिप सुरू केल्यावर आणि ठराविक कालावधी पूर्ण झाल्यावर दोन टप्प्यांत एकूण ६ हजार रुपये रुपयांचे एकरकमी अनुदान दिले जाईल. प्रत्येक उमेदवाराला प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना आणि प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना अंतर्गत जीवन आणि अपघाती विमा कवच दिले जाईल.

इच्छुक उमेदवारांना मंत्रालयाच्या अधिकृत पोर्टल www.pminternship.mca.gov.in वर जाऊन आपली नोंदणी करावी लागेल. या पोर्टलवर उमेदवारांना त्यांच्या पसंतीचे क्षेत्र, स्थान आणि कंपनी निवडण्याची सुविधा उपलब्ध असेल. कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय या योजनेसाठी नोडल एजन्सी म्हणून काम पाहत असून, उद्योगांच्या सहभागातून या प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी केली जात आहे. तरुणांना उद्योगांच्या गरजेनुसार कौशल्य प्राप्त करून देऊन त्यांची रोजगारक्षमता वाढवणे, हा या योजनेचा मूळ हेतू आहे.

## विश्वजित प्रतिष्ठाणकडून अन्नदानाचा उपक्रम; वाढदिवसानिमित्त अनाथ मुलांसोबत आनंद वाटप

**लातूर/प्रतिनिधी** : विश्वजित प्रतिष्ठाण, लातूरच्या वतीने सदस्य प्रा. युवराज बी. अंधोरीकर यांच्या वाढदिवसानिमित्त एक प्रेरणादायी सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. '' आईचं घर संत गाडगेबाबा अनाथ मतिमंद मुलांचे बालगृह , कातपूर रोड, लातूर'' येथे अनाथ व विशेष मुलांसाठी अन्नदानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.




या उपक्रमातून बालगृहातील ९७ मुलांना पौष्टिक व स्वादिष्ट अन्न देण्यात आले. यावेळी मुलांसोबत संवाद साधत त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्याचा प्रयत्न करण्यात आला. केवळ अन्नदान नव्हे, तर आपुलकी आणि माणुसकीची ऊब देण्याचा हा प्रयत्न होता.

कार्यक्रमात प्रा. विनोद टेंकाळे, प्रसेनजीत कांबळे आणि संजय भैया सुरवसे यांनी मनोगत व्यक्त करत प्रा. अंधोरीकर यांच्या या उपक्रमाचे कौतुक करून केले व वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

प्रा. युवराज बी. अंधोरीकर यांनी यावेळी बोलताना, ''वाढदिवस हा केवळ उत्सव नसून समाजासाठी काहीतरी देण्याची संधी आहे. वंचित आणि गरजू मुलांसोबत आनंद वाटल्याने खऱ्या अर्थाने समाधान मिळते,'' असे मत व्यक्त करून भविष्यात असे सामाजिक कार्यक्रम विश्वजित प्रतिष्ठाण च्या वतीने राबविण्यात येणार असल्याचे सांगितले. या कार्यक्रमास परिवारातील सर्व सदस्य, प्रतिष्ठाणचे सचिव प्रसेनजीत कांबळे, उपाध्यक्ष सचिन हिंगे, प्रा. विनोद टेंकाळे, कमल हिंगे, माया अंधोरीकर चांदणी कांबळे, आरोही कांबळे, संजय भैया सुरवसे, यशपाल कांबळे, साहिल कांबळे, इंद्रप्रस्थ कांबळे, रोहन टेंकाळे, प्रतीक टेंकाळे, आदित्य कांबळे तसेच प्रतिष्ठाणचे इतर सदस्य आणि अंधोरीकर यांचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा उपक्रम समाजात सकारात्मक संदेश देणारा ठरला असून, अशा उपक्रमांमुळे समाजातील वंचित घटकांप्रती संवेदनशीलता वाढीस लागते, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

### अहिल्यानगरकडे निघालेल्या एसटी बसचा अपघात, स्कॉर्पिओची धडक; भीषण अपघातात ४ ठार ४ जखमी

**ठाणे/प्रतिनिधी** : कल्याण-आहिल्यानगर महामार्गावरील वैशाखरे टोकावडे येथे बस आणि स्कॉर्पिओ कारचा भीषण अपघात झाला असून अपघातात स्कॉर्पिओमधील ४ जणांचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती आहे. तर, ४ प्रवासी गंभीर जखमी आहेत. विठ्ठलवाडी-कल्याण-आहिल्यानगरला जाणारी बस आणि स्कॉर्पीओ गाडीची धडक बसल्याने हा अपघात झाला. विठ्ठलवाडी आगारातून कल्याण-अहिल्यानगरसाठी सकाळी साडेआठ वाजता ही एसटी निघाली होती. मुरबाड तालुक्यातील टोकावडे-वैशाखरे हद्दीत स्कार्पिओ कारसोबत बसची धडक होऊन अपघात झाला. अपघातानंतर स्थानिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मदत व बचावकार्य सुरू केले होते.

# लातूर जिल्ह्यात इंधनाची कृत्रिम टंचाई निर्माण करून जनतेची लूट

## तातडीने पुरवठा सुरळीत न झाल्यास तीव्र आंदोलनाचा काँग्रेसचा इशारा

**लातूर/प्रतिनिधी** : लातूर शहर आणि जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून पेट्रोल आणि डिझेलचा मोठ्या प्रमाणावर तुटवडा जाणवत असून, ही टंचाई नैसर्गिक नसून इंधन कंपन्या आणि पेट्रोल पंप चालकांनी संगनमताने निर्माण केलेली कृत्रिम टंचाई आहे, असा खळबळजनक आरोप लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने करण्यात आला आहे. या गंभीर प्रश्नावर आज लातूर जिल्हाध्यक्ष श्री. अभय साळुंके व लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अॅड. किरण जाधव यांनी जिल्हाधिकाऱ्यांना लेखी निवेदन सादर करून प्रशासनाचे लक्ष वेधले.

निवेदनात नमूद केल्यानुसार, सध्या देशामध्ये एकीकडे इंधनाचा तुटवडा नसल्याचे सरकार छातीठोकपणे सांगत आहे, तर दुसरीकडे प्रत्यक्ष



जमिनीवर परिस्थिती अत्यंत भयावह आहे. इंधन कंपन्या आणि पेट्रोल पंप चालक जाणीवपूर्वक साठेबाजी करून कृत्रिम टंचाई निर्माण करत आहेत. ज्याप्रमाणे गॅसचे दर वाढवून जनतेवर बोजा टाकण्यात आला, त्याच धर्तीवर पेट्रोल-डिझेलचे दर वाढवण्याचे हे एक मोठे षडयंत्र असल्याचे काँग्रेसने म्हटले आहे.

लातूर शहरासह जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये अनेक पेट्रोल पंपांवर ''पेट्रोल-डिझेल शिल्लक नाही'' असे खोटे फलक लावले जात आहेत. ज्या मोजक्या पंपांवर इंधन उपलब्ध आहे, तिथे नागरिकांच्या दोन-दोन किलोमीटरपर्यंत लांब रांगा लागत आहेत. तासनतास ताटकळत उभे राहिल्यामुळे सामान्य जनता, शेतकरी आणि नोकरदार वर्ग प्रचंड त्रस्त झाला आहे. लोककल्याणकारी राज्याची संकल्पना असलेल्या संविधानाचे नाव घेणारे केंद्र व राज्य सरकार जनतेची ही लूट उघड्या डोळ्यांनी पाहत असल्याचा घणाघातही या प्रसिद्धीपत्रकाद्वारे करण्यात आला आहे.

जिल्हा प्रशासनाने घोषित करावे की जिल्ह्यात नेमका इंधनाचा साठा किती आहे.जर प्रशासनाच्या मते इंधन तुटवडा नाही, तर खोटे बोर्ड लावणाऱ्या पेट्रोल पंप चालकांवर तातडीने कायदेशीर कारवाई करावी. सर्व संबंधित तहसीलदारांना आदेश देऊन इंधन साठ्याची तपासणी करावी. जनतेची या त्रासातून मुक्तता करण्यासाठी तात्काळ इंधन पुरवठा सुरळीत करावा. अशा मागण्या काँग्रेसने प्रसिद्धीपत्रकाद्वारे केलेल्या आहेत

प्रशासनाने या विषयाचे गांभीर्य ओळखून त्वरित पावले उचलावीत. जर येत्या काही दिवसांत इंधन पुरवठा सुरळीत झाला नाही, तर काँग्रेस पक्षाच्या वतीने जिल्हाभर रस्त्यावर उतरून सळो की पळो करून सोडण्यात येईल,'' असा स्पष्ट इशारा अभय साळुंके आणि अॅड.किरण जाधव यांनी दिला आहे. यावेळी काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.